शनिवार, १६ एप्रिल २०२२
राम प्रहर
◆ वर्ष १४ ◆ अंक २६८
www.ramprahar.com
◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २ ◆ रायगड

## अंतरंग

'प्रधानमंत्री संग्रहालयाला काँग्रेसचा विरोध दुर्दैवी'/२
मुरूड समुद्रकिनारी पसरला तेलाचा तवंग/५
सुधागडच्या सुश्मिताचे राष्ट्रीय विक्रमासह 'सुवर्ण'/८

## आयपीएलच्या बायो बबलमध्ये कोरोनाची एण्ट्री



**मुंबई** : आयपीएलच्या बायो बबलमध्ये कोरोनाने एण्ट्री केली आहे. दिल्ली कॅपिटल्सचे फिजियो पॅट्रिक फरहार्ट यांना कोरोनाची लागण झाली आहे. आयपीएल समितीने शुक्रवारी (दि. १५) याबाबतची माहिती दिली. पॅट्रिक फरहार्ट सध्या डॉक्टरांच्या देखरेखीखाली उपचार घेत आहेत. कोरोना महामारीमुळे आयपीएलचा गेला हंगाम प्रभावित झाला होता. ४ मे २०२१ रोजी आयपीएल अर्ध्यातूनच थांबवावी लागली होती. त्यानंतर उर्वरित आयपीएल सामने दुबईमध्ये घेण्यात आले. २०२१मध्ये सनराइजर्स हैदराबादचा यष्टीरक्षक वृद्धिमान साहा आणि दिल्ली कॅपिटल्सचा फिरकीपटू अमित मिश्रा यांना कोरोनाचा संसर्ग झाला होता. त्यामुळे आयपीएलचे सामने स्थगित करण्यात आले. त्यानंतर बीसीसीआयने उर्वरित सामने दुबईमध्ये खेळवले. आता पुन्हा एकदा कोरोनाने शिरकाव केल्याने आयोजकांची चिंता वाढली आहे.

# मुख्यमंत्र्यांच्या मेव्हण्याच्या कंपनीत मनी लॉण्डरिंग

## भाजप नेते किरीट सोमय्या यांचा आरोप

**मुंबई : प्रतिनिधी**

भाजप नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांनी शुक्रवारी (दि. १५) मुंबईत पत्रकार परिषद घेत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे मेव्हणे श्रीधर पाटणकर यांच्या कंपनीत मनी लॉण्डरिंग झाले असल्याचा आरोप केला. त्याचवेळी ठाकरे कुटुंबीयांनीही हवाला ऑपरेटर नंदकिशोर चतुर्वेदीसोबत व्यवहार केले असल्याचेही सोमय्या या वेळी म्हणाले.

भाजप नेते किरीट सोमय्या यांनी शुक्रवारी मुंबईत पत्रकार परिषद घेऊन ठाकरे सरकारचा आणखी एक घोटाळा उघड करणार असल्याचे जाहीर केले होते. त्यानुसार त्यांनी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे मेव्हणे श्रीधर पाटणकर यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. ते म्हणाले की, श्रीधर पाटणकर हे श्रीजी होम्स या कंपनीत भागीदार आहेत. या कंपनीकडून मुंबईतील शिवाजी पार्क येथे एक इमारत उभारण्यात आली आहे. कोट्यवधींची मालमत्ता असलेल्या या इमारतीच्या बांधकाम प्रकल्पासाठी श्रीधर पाटणकर यांचा काळा पैसा वापरण्यात आला. या प्रकल्पातील २९ कोटी ६२ लाख २९ हजार ३२० रुपये हे आर्थिक गैरव्यवहाराच्या माध्यमातून कंपनीत आले आहेत. त्यासाठी श्रीधर पाटणकर यांनी हवाला ऑपरेटर नंदकिशोर चतुर्वेदी याची मदत घेतली होती. त्यामुळे आता मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी श्रीजी होम्स या कंपनीशी आपला काय संबंध आहे हे जाहीर करावे.



ठाकरे परिवारातील आदित्य ठाकरे, तेजस ठाकरे आणि श्रीधर पाटणकर यांचे नंदकिशोर चतुर्वेदी याच्यासोबतचे अनेक आर्थिक व्यवहार बाहेर आले आहेत. मी तपास यंत्रणांच्या अधिकाऱ्यांची चर्चा केली आहे. ते नंदकिशोर चतुर्वेदीला शोधत आहेत. त्यामुळे नंदकिशोर चतुर्वेदीला फरार घोषित करण्यात यावे ही आमची मागणी आहे. महाराष्ट्र सरकारचे भ्रष्टाचाराचे पैसे मनी लॉण्डरिंग करण्यात यांनी मदत केली आहे, असा आरोप भाजप नेते किरीट सोमय्या यांनी केला.

### ठाकरे कुटुंबीयांच्या व्यवहारांवरही उपस्थित केले प्रश्नचिन्ह

हवाला ऑपरेटर असलेला नंदकिशोर चतुर्वेदी आणि आदित्य ठाकरे यांच्यातील तीन कंपन्यांमधील व्यवहार मी काही दिवसांपूर्वी समोर आणला होता. ठाकरे कुटुंबीयांनी याबद्दल एक शब्दही उच्चारलेला नाही. तर मग ठाकरे कुटुंबीय नंदकिशोर चतुर्वेदीचा मनी लॉण्डरिंगसाठी वापर करीत होते हे सत्य मानायचे का?, असा सवालही भाजप नेते सोमय्या यांनी उपस्थित केला आहे.

### नंदकिशोर चतुर्वेदी कुठे आहे?

आदित्य ठाकरे, तेजस ठाकरे यांनी हवाला ऑपरेटर नंदकिशोर चतुर्वेदी याच्याशी व्यवहार केले आहेत. मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंना माझी विनंती आहे की, त्यांचे कौटुंबिक मित्र, हवाला ऑपरेटर असलेल्या नंदकिशोर चतुर्वेदीला आपण कुठे लपवले आहे त्याची माहिती जनतेला द्यावी.

## केंद्रीय मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया आज किल्ले रायगडावर

### शिवपुण्यतिथीनिमित्त करणार अभिवादन

**महाड : प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३४२व्या पुण्यतिथीनिमित्त श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ व स्थानिक उत्सव समिती (महाड) यांच्या वतीने किल्ले रायगडावर शिवपुण्यतिथी अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात शनिवारी (दि. १६) केंद्रीय नागरी उड्डाणमंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराज पुण्यतिथीच्या निमित्ताने पहाटे ५ वा. श्री जगदिश्वर पूजा, सकाळी ६ वा. श्री हनुमान जन्मोत्सव, ८ वा. छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीची पूजा, ९ वा. राजदरबार येथे शिवप्रतिमा पूजन, छत्रपती शिवरायांना आदरांजली, ११ वा. छत्रपतींच्या प्रतिमेची राजदरबार ते शिवसमाधी पालखीतून मिरवणूक आणि दुपारी १२.३०वा. छत्रपतींना मानवंदना देऊन त्यानंतर शिवभक्तांना महाप्रसादाचे वितरण केले जाणार आहे.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने शिवपुण्य स्मृती पुरस्काराने भारतीय नौदलातील निवृत्त सर्जन कमांडर आणि इतिहास संशोधक डॉ. उदय कुलकर्णी यांना गौरविण्यात येणार आहे तसेच अतिविशिष्ट सेवापदक व परमविशिष्ट सेवापदकप्राप्त व्हाईस ॲडमिरल मुरलीधर पवार, नरवीर



तानाजी मालुसरे व सूर्याजी मालुसरे यांचे वंशज समस्त मालुसरे घराणे यांचादेखील विशेष सन्मान करण्यात येणार आहे.

पुरस्कार स्वीकारण्यासाठी साखर, एरंडवाडी, सातारा जिल्ह्यातील गोडोली, फुरुस, पारगड, पारमाची, किवे, आंबेशिवथर, लव्हेरी, जामगाव मुळशी, जळगाव, धुळे, बारामती, कासुर्डी गुमा (भोर), शिवथर, निगडे (भोर), हिर्डोशी अशा महाराष्ट्रातील ७० गावांतील मालुसरे परिवारातील ज्येष्ठ मान्यवर व्यक्ती आणि तरुण सामाजिक कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत.

छत्रपतींना आदरांजली वाहण्यासाठी शिवपुण्यतिथी अभिवादन कार्यक्रमास शिवभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळाचे अध्यक्ष रघूजीराजे आंग्रे, सरकार्यवाह पांडुरंग बलकवडे, कार्यवाह सुधीर थोरात आणि स्थानिक उत्सव समितीचे (महाड) अध्यक्ष त्रिंबक पुरोहित, कार्यवाह संतोष कदम यांनी केले आहे.






**पनवेल : शेकापचे केळवणे जि. प. गटाचे सदस्य ज्ञानेश्वर घरत, आपटा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच दत्ता पाटील, कर्नाळा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच शेखर कानडे, राजू पाटील व त्यांच्या असंख्य सहकाऱ्यांनी शुक्रवारी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. आपटा गावातील मैदानावर झालेल्या या पक्षप्रवेश समारंभास विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते प्रवीण दरेकर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. या वेळी मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.**
(छाया : लक्ष्मण ठाकूर) **वृत्त उद्याच्या अंकात.**

## निवडक

### कोरोना रुग्णसंख्या वाढू लागल्याने केंद्राकडून अलर्ट

**नवी दिल्ली** : कोरोना संसर्गाची तिसरी लाट ओसरल्याने मोठ्या प्रमाणात दिलासा मिळाला असतानाच आता चौथ्या लाटेचे संकट घोंगावताना दिसत आहे. देशातील काही भागांत पुन्हा एकदा कोरोनाची दैनंदिन रुग्णसंख्या वाढत असून आरोग्य यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. दरम्यान, केंद्रीय आरोग्यमंत्री मनसुख मांडवीय यांनी कोविड अजून गेलेला नाही, असे नमूद करीत सर्वांना खबरदारी घेण्याचे आवाहन आधीच केले आहे.

### कोल्हापूरमधील विधानसभा पोटनिवडणुकीचा आज निकाल

**कोल्हापूर** : विधानसभेच्या कोल्हापूर उत्तर मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीचा निकाल शनिवारी (दि. १६) लागणार आहे. या पोटनिवडणुकीसाठी महाविकास आघाडीकडून काँग्रेसच्या जयश्री जाधव आणि भाजपकडून सत्यजित कदम यांच्यात प्रमुख लढत आहे. जलसंपदा विभागाच्या गोदामात मतमोजणी होईल.

## बोरघाटात रिक्षा उलटून दोघांचा मृत्यू, एक जण गंभीर जखमी



**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावर बोरघाटात शुक्रवारी (दि. १५) पहाटे एका रिक्षेचा गंभीर अपघात होऊन दोन जणांचा जागीच मृत्यू झाला असून रिक्षाचालक गंभीर जखमी आहे. त्याला खोपोलीत उपचारानंतर पनवेल येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

खंडाळ्याकडून खोपोलीच्या दिशेने रिक्षा येत असताना बोरघाटातील शिंग्रोबा मंदिराजवळच्या अवघड वळणावर चालकाचे नियंत्रण सुटल्याने रिक्षा रस्त्याच्या कडेच्या डोंगरावर आपटून उलटली. या गंभीर अपघातात बालाजी विजेंद्र राव आणि मच्छिंद्र संभाजी काळे यांचा गंभीर दुखापत व अतिरक्तस्रावामुळे जागीच मृत्यू झाला, तर चालक गणेश चव्हाण हा रिक्षेत अडकला होता. त्याला बाहेर काढण्यात आले. प्रथम त्याला खोपोली नगर परिषदेच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र प्रकृती गंभीर असल्याने पनवेल येथील एमजीएम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

अपघातग्रस्त तिघे नेरूळ येथील रहिवासी असून ते मित्र आहेत. खंडाळा येथे काही कामानिमित्त ते आले होते. त्यानंतर पहाटेच्या सुमारास परतत असताना त्यांच्या रिक्षेला अपघात झाला. या अपघाताबाबत खोपोली पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून अधिक तपास सुरू आहे.



**उलवे नोड : शेलघरकडून गव्हाणकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम सिडकोच्या माध्यमातून करण्यात येत आहे. या रस्त्याची माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुक्रवारी पाहणी केली व आवश्यक त्या सूचना केल्या. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, महिला मोर्चा उलवे नोड अध्यक्ष व ग्रामपंचायत सदस्य योगिता भगत, उषा देशमुख, अजय भगत, प्रकाश भगत, अमृत भगत, जयवंत देशमुख, अनंता ठाकूर, भाऊशेठ पाटील, सुहास भगत, किशोर पाटील, सुधीर ठाकूर, प्रमोद देशमुख, महेंद्र देशमुख, प्रमोद कोळी आदी उपस्थित होते.**

## गुणरत्न सदावर्तेंना पोलीस कोठडी

**सातारा : प्रतिनिधी**

मराठा आरक्षणादरम्यान केलेल्या वादग्रस्त वक्तव्याप्रकरणी दीड वर्षापूर्वी दाखल झालेल्या प्रकरणात ॲड. गुणरत्न सदावर्ते यांना न्यायालयाने चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. सातारा पोलिसांनी गुरुवारी सदावर्तेंना ताब्यात घेतले होते.

खासदार उदयनराजे भोसले आणि खासदार संभाजीराजे यांच्याबद्दल अपशब्द वापरल्याच्या एका जुन्या प्रकरणात ॲड. गुणरत्न सदावर्ते यांना सातारा पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. सदावर्ते यांनी ७ ऑक्टोबर २०२० रोजी एका वृत्तवाहिनीशी बोलताना छत्रपती घराण्याबाबत आक्षेपार्ह विधाने केली होती. यानंतर तारळे (ता. पाटण) येथील राजेंद्र निकम यांनी त्यांच्याविरोधात सातारा शहर पोलीस ठाण्यात तक्रार दिली होती. त्यानुसार ॲड. सदावर्ते यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

## फॅशन शोच्या रॅम्पवर अवतरणार छोट्यांची किलबिल

# दिव्यांग मुलेसुद्धा करणार रॅम्प वॉक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल स्मार्ट मम्मीज अर्थात पीएसएम या पनवेलमधील सेवाभावी संस्थेच्या वतीने रविवारी (दि. १७) सायंकाळी ४.३० वाजता लहान मुलांसाठी फॅशन शोचे आयोजन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे या फॅशन शोमध्ये दिव्यांग मुलेदेखील सहभागी होणार आहेत. शारीरिक कमतरतेवर मात करत त्यांच्या ठायी विजिगीषू वृत्ती जागृत व्हावी या उद्देशाने दिव्यांग मुलांचा रॅम्प वॉक आयोजित करीत असल्याचे पीएसएमच्या संस्थापिका शीतल ठक्कर यांनी सांगितले.




या कार्यक्रमाला भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष विक्रांत पाटील, दिलीप पाटील, शुभांगी घरत, डॉ. कल्पना शेट्टे यांची उपस्थिती असणार, अशीही माहिती त्यांनी दिली.

या फॅशन शोची पूर्वतयारी म्हणून गुरुवारी सराव सत्र झाले. हा फॅशन शो पनवेलच्या आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आयोजित करण्यात आला आहे. आयोजनाबाबत अधिक माहिती देताना कविता ठाकूर यांनी सांगितले की, मुलांच्यात आत्मविश्वास वाढीस लागावा हा आमचा आयोजनापाठचा मूळ हेतू आहे तसेच दिव्यांग मुलेदेखील कुठल्याही क्षेत्रात कमी नसतात हा सामाजिक संदेश देण्याचा आमचा हा प्रामाणिक प्रयत्न असेल, तर संस्थापिका शीतल ठक्कर म्हणाल्या की, कोरोना विषाणूच्या आक्रमणामुळे जवळपास गेली दोन वर्षे मुलांच्या कुठल्याही ॲक्टिव्हिटीज होत नव्हत्या. शिक्षण, मनोरंजन, शारीरिक अभ्यासक्रम या सगळ्यांसाठी त्यांना ऑनलाइन माध्यमातून सामोरे जावे लागत होते. या कार्यक्रमाच्या निमित्ताने त्यांनी एकत्र यावे आणि फॅशन शोमध्ये सहभागी व्हावे, असे आम्हाला वाटले.

आमच्या संस्थेने यापूर्वी महिलांसाठी क्रिकेट लीग, ज्येष्ठ नागरिकांसाठी रॅम्पवॉक, पालकांसाठी फॅशन शो, चूल आणि मूल यात अडकलेल्या स्त्रीमधील उपजत गुणांना वाव देण्यासाठी विविध फॅशन शोजचे आयोजन केले आहे. रविवारी होणाऱ्या दिव्यांग मुलांच्या फॅशन शोचा आनंद घेण्यासाठी आणि त्यांना पाठबळ देण्यासाठी सगळ्यांनी आवर्जून उपस्थित राहावे, असे आवाहनदेखील शीतल ठक्कर यांनी केले आहे.



**खारघर : रामकृष्णा उलीची आणि संध्या उलीची यांनी सेक्टर ३५ येथे अपोलो डायग्नॉस्टिक सेंटर नव्याने सुरू केले आहे. त्याचे उद्घाटन पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते गुरुवारी झाले. या वेळी भाजप युवा नेते समीर कदम, साऊथ इंडियन सेलचे श्रीनिवास कोडुरु आदी उपस्थित होते.**